प्रेस नोट दि.१६/०७/२०२२

## निगडी पोलीस ठाणे तपास पथकाची कामगिरी
## प्रियसीला फिरवण्यासाठी चारचाकी व दुचाकी वाहने चोरणा-या अट्टल गुन्हेगारास अटक करुन एकुण १४ गुन्हे उघडकीस आणुन ३,४५,०००/- रु. चा मुद्देमाल जप्त हरतगत

---

मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी बिनतारी संदेशाद्वारे रात्रगस्त दरम्यान विनाकारण फिरणारे इसमांना अचानकपणे चेक करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार निगडी पोलीस ठाणेकडील तपास पथक व अधिनस्थ पोलीस अंमलदार यांना सुचनेप्रमाणे कामगिरी करणेबाबत प्रोत्साहित करण्यात आले होते.

त्याप्रमाणे दि.१३/०७/२०२२ रोजी तपास पथकाचे पोना/१५९३ दिवटे व पोना/१५७९ बोडके यांना गस्ती दरम्यान ट्रान्सपोर्टनगर परीसरात मारुती ८०० लाल रंगाचे चारचाकी वाहन संशयीतरित्या फिरत असताना दिसल्याने त्यांनी सदर वाहन चालकांस हटकले असता तो त्याचे ताब्यातील वाहन घेऊन पळुन जात असताना त्यास नमुद अंमलदार यांनी पाठलाग करुन पकडले. सदर इसमांस त्याचे नांव, पत्ता विचारता त्याने त्याचे नांव यश किरण सोळसे वय २० वर्षे रा. विशाल लॉन्सच्या मागे, एम.आय.डी.सी. रोड, तळेगांव दाभाडे, पुणे असे सांगीतले. त्याचेकडे वाहनांचे कागदपत्राबाबत विचारपुस करता तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने त्याला पोलीस ठाणेस आणुन विचारपुस करता त्याने सदरची कार प्राधिकरण, निगडी, पुणे येथुन ७ दिवसापुर्वी चोरली असल्याची कबुली दिल्याने निगडी पोलीस ठाणेकडील अभिलेख तपासुन पाहता सदर कारबाबत निगडी पोलीस ठाणेस गु.र.नं. ५१८/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे दाखल असल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोना/१५९३ दिवटे यांनी त्यास अटक करुन त्याची पोलीस कोठडी रिमांड घेऊन आरोपीकडे तपास करता त्याने सांगवी पोलीस ठाणेचे हद्दीतुन एक मारुती ८०० कार चोरली असल्याचे तसेच निगडी, सांगवी, पिंपरी, देहुरोड तसेच तळेगांव दाभाडे पोलीस ठाणेचे हद्दीतुन १३ मोटार सायकल चोरी केली असल्याची तपासात निष्पन्न झाले असुन आरोपीकडुन एकुण २ चारचाकी वाहने व १३ चोरीच्या मोटार सायकलसह एकुण ३,४५,०००/- रु. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | जप्त केलेले वाहन |
|---|---|---|---|
| १ | निगडी पो.ठाणे | ५१८/२०२२ भादवि ३७९ | MH-14/AV-4020 (कार) |
| २ | निगडी पो.ठाणे | ५२०/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ GG-7274 |
| ३ | निगडी पो.ठाणे | ५१६/२०२२ भादवि ३७९ | MH-14/GP-5893 |
| ४ | सांगवी पो.ठाणे | ३०७/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ X-4022 (कार) |
| ५ | सांगवी पो.ठाणे | २९०/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ FV-8043 |
| ६ | सांगवी पो.ठाणे | २९२/२०२२ भादवि ३७९ | MH-12/ DZ-2426 |
| ७ | सांगवी पो.ठाणे | २९६/२०२२ भादवि ३७९ | MH-20/ EU-6872 |
| ८ | सांगवी पो.ठाणे | २७४/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ EK-4595 |
| ९ | सांगवी पो.ठाणे | १९४/२०२२ भादवि ३७९ | MH-11/ BN-5966 |
| १० | सांगवी पो.ठाणे | २७८/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ FJ-0380 |
| ११ | सांगवी पो.ठाणे | २६९/२०२२ भादवि ३७९ | MH+12/ KZ-8203 |
| १२ | तळेगांव पो.ठाणे | ३३७/२०२२ भादवि ३७९ | MH-13/ DP- 9604 |
| १३ | पिंपरी पो.ठाणे | ५३५/२०२२ भादवि ३७९ | MH-14/ EA-0391 |
| १४ | देहुरोड पो.ठाणे | ४७५/२०२२ भादवि ३७९ | MH-11/ AV-8633 |
| १५ | जप्त | टीव्हीएस. अपाची मो.सा | MH-02/ CM-4463 |

Scanned with CamScan

जप्त करण्यात आलेल्या कार व मोटार सायकल कशासाठी चोरल्या याबाबत आरोपीकडे विचारपुस करता त्याने त्याचे प्रेयसीला फिरवण्यासाठी सदर कार व मोटार सायकल चोरी केली असल्याची तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.अंकुश शिंदे पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड. मा.डॉ.श्री. संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो.पिंपरी चिंचवड, मा.श्री.मंचक इप्पर सो. पोलीस उपआयुक्त सो परिमंडळ- १, पिंपरी चिंचवड, मा.डॉ.श्री. सागर कवडे सो. सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रंगनाथ उंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विश्वजीत खुळे पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमोल कोरडे, सहा.पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस हवालदार सुधाकर अवताडे, सतिश ढोले, दत्तात्रय शिंदे, विलास केकाण, पोलीस नाईक शंकर बांगर, विनोद व्होनमाने, सोमनाथ दिवटे, विजय बोडके, भुपेंद्र चौधरी, राहुल गायकवाड, तुषार गेंगजे, राहुल मिसाळ यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांनी केली आहे.

(मंचक इप्पर)
पोलीस उप-आयुक्त
परि-१ पिंपरी चिंचवड आयुक्तालय

Scanned with CamScanner